The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
===========================================================
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
-----------------------------------------------------------------------------------------------------------
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024
===========================================================

# संत साहित्यातील विश्वात्मकता

**डॉ.कविता चंद्रकांत लोहाळे**

**मराठी विभाग, ग्रामीण (कला वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर, मुखेड**

मराठी साहित्य विश्वात संत साहित्याला अनन्य साधारण महत्व आहे. अनेक मराठी संतांनी आपल्या रचनेद्वारे समाज मनात एक अढळ स्थान प्राप्त केले आहे. संतांच्या रचनेतून आध्यात्मिक साधनेला जसे महत्व दिले गेले तेवढेच महत्त्व त्यांनी सामाजिक जागृतीला दिले हे दिसून येते प्रपंच आणि परमार्थ यांच्या अद्वेत रूपाचे महत्त्व जसे संत साहित्यातून दिसून येते तसेच मानवी जीवनाला श्रीमंत व समृद्ध करणारी जी चिरंतन मूल्ये देखील संत साहित्यातून सातत्याने आढळून येतात. साऱ्या संतांनी जीवन मुल्यांचा उद्घोष केला आहे, त्यांचे श्रेष्ठत्व पुन्हा पुन्हा विशद केले आहे. सदाचार, सद्विचार पावित्र्य,चारित्र्य, नीतिमत्ता, औदार्य, सेवा, करुणा, समता, बंधुता, न्याय, अनासक्ती आणि समर्पण या मुल्यांच्या उपासनेतूनच व्यक्तीचे कल्याण होऊ शकते हा संदेश आपणास संत साहित्य देते पैशाला दैवत्व बहाल करणाऱ्या,सुखोपभोगात रममाण होणाऱ्या जीवांना, चंगळवादाची शिकार बनलेल्या आणि दुसऱ्यांचे शोषण करून, त्यांच्या जीवावर राजविलास भोगणाऱ्या आजच्या समाजाला या चिरंतन मूल्यांची अधिक गरज आहे असे वाटते.आजचा मनुष्य पशु पेक्षाही हिंस्र झाला आहे. त्यांच्यातला चांगुलपणा लोप पावत आहे अशा प्रसंगी या मानवी मूल्यांची नितांत आवश्यकता भासते. ही सारी मानवी मूल्ये ज्ञानदेवांना विठ्ठरायांच्या ठिकाणी सामावलेली आढळतात. ते म्हणतात, 'बहुता सुकृतांची जोडी। म्हणून विठ्ठली आवडी

सर्व सुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर' वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत म्हणजे विठ्ठल. विठ्ठलाच्या पायी सर्व जाती धर्मातील, वेगवेगळ्या सामाजिक स्तरातील लोकांना सामावून घेतले जात होते. पसायदान हे तर ज्ञानेश्वरीचे अमृत मधूर फळ आहेमूळात ज्ञानेश्वरी हेच एक अमृततुल्य वृक्ष ज्यापासून आपणास मानवी जीवनात आवश्यक अशा सर्व गोष्टींची माहिती मिळते. पसायदानात संत ज्ञानेश्वरांनी माणसाच्या मूलभूत माणूसपणावर प्रगाढ विश्वास टाकला आहे. पसायदानातून त्यांनी माणसातील चांगुलपणा बाहेर काढण्यासाठी एक आशावाद समोर ठेवून विश्वात्मक देवाकडे मागणे मागितले आहे.

पसायदानातील ज्ञानेश्वरांची पहिली मागणी आहे, :जे खळांची व्यंकटी सांडो'. जगामध्ये दुष्टांमधील दुष्टावा तेवढा नहीसा होवो. त्यांची खलत्वाची नांगी गळून पडो. खलांना मानव जातीचे वैरी बनवणारी ही व्यंकटी ती तेवढी नष्ट झाली की त्यांचा ही स्वभाव, वर्तन सरळ होईल. दुष्टावा गळून पडलेल्या माणसांची सत्कर्माबद्दलची आवड वाढीस लागेल. यामुळे सर्व

जीव जातींमध्ये परस्परांबद्दल सौहार्द उत्पन्न होईल. ज्ञानेश्वरांची पसायदानातील तिसरी कामना 'भुतां परस्परे जडो। मैत्र जिवांचे' ज्ञानेश्वरांनी या ठिकाणी मैत्र हा शब्द वापरला आहे. तेही जीवांचे मैत्र, म्हणजेच परस्परांवर स्वतःच्या प्राणाइतके प्रेम करणारी जिवलग मैत्री ज्ञानेश्वरांना अभिप्रेत आहे. एकूणच काय तर पसायदानात संपूर्ण विश्वातील मणुष्याविषयीचा अंतरिक जिव्हाळा प्रकटताना दिसतो.

समाजातल्या सर्व थरातल्या लोकांना वारकरी संप्रदायाच्या छताखाली आणण्याचे श्रेय नि:संशय ज्ञानदेवांकडे जाते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेने विदीर्ण केलेल्या मनाला त्यांनी आपल्या समन्वयशील विचारसरणीने साऱ्या विश्वाशी जोडले.क्रांतदर्शी तत्त्वज्ञ, प्रतिभा संपन्न साहित्यिक व प्रभावी नितीशिक्षक अशा तिन्ही भूमिका ज्ञानदेवांच्या ठायी एकवटल्या होत्या. ह.श्री.शेणोलीकर म्हणतात ,'सत्य, अहिंसा, दया, सर्वाभूती समभाव, अमानित्व, अदंभत्व, अक्रोधत्व इत्यादी गुणांचे स्वरूप स्पष्ट करताना, वैयक्तिक आणि सामाजिक दोन्ही अंगाने ज्ञानेश्वर विचार करीत होते,असे स्पष्ट दिसून येते' कुळ जाति वर्ण ।हे आघवेचि गा अकारण' अशा जातीभेद रहित विचारांचा पुरस्कार ज्ञानेश्वरांनी केला तसेच उद्याच्या आदर्श समाज जीवनाचे ज्ञानदेवांनी पाहिलेले सुंदर स्वप्न ही त्यात दडले आहे.

ज्ञानेश्वरांनी रचलेल्या भागवत संप्रदायाच्या इमारतीचा कळस होण्याचे भाग्य संत तुकारामांना लाभले. संत तुकारामांचे जीवन विषयक चिंतन अत्यंत मुलगामी व प्रगल्भ तर आहेच पण त्याचबरोबर ते बहुपेढी आहे धर्म हा मानवाच्या उद्धारासाठी व कल्याणसाठी असतो केवळ मानवाच्या कल्याणासाठी नव्हे. संपूर्ण विश्वातल्या प्राणीमात्रांच्या कल्याणाची भूमिका अगदी ठामपणे संत तुकाराम मांडतात तुकारामांनी वारकरी संप्रदायाच्या समतावादी व बंधुत्ववादी विचारांचा, अनेक प्रकारच्या विरोधांशी सामना करीत अत्यंत निर्भीडपणे आपल्या अभंगवाणीतून पुरस्कार केला या मानवतावादी विचारसरणीचा उध्दघोष त्यांनी अनेक अभंगातून केला. 'जे का रंजले गांजले।त्यासि म्हणे जो आपुले' उद्गगारातून त्यांचा मानवतावाद किती समर्थपणे झळकतो. या रे सारे लहान थोर। यातिं भलते नारी नर। असे आवाहन करून भक्ती संप्रदायापुरते त्यांनी जातीभेद मोडून काढले. भक्तीच्या क्षेत्रात कुल, जाती, वर्ण हे प्रमाण नसून,'गुणांचे कारण अंगी वसे' असेही ते सांगतात. नीतियुक्त आचरण आणि शुद्ध अंतःकरण येथे महत्त्वाचे असते. 'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । त्याच्या गळा माळ असो नसो।' प्रयत्नांच्या बळावर आत्मोन्नती साधता येते. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म' हे पटवून 'शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी' निपजतात हे जनमानसावर ठसविले. 'दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दाळण कंटकांचे' अशी डोळस भक्ती आणि सामाजिक नीति तुकोबा साऱ्या विश्वातील मानवाला शिकवितात. केवळ वारकऱ्यांनाच नव्हे तर साऱ्या

समाजाला नीतिमूल्यांची आठवण करून देणे हे तुकोबांनी आपले कर्तव्य मानले सामाजिक जीवनात त्यांनी नीती हीच भक्ती मानली. समाजाच्या मनात प्रांजळ भक्तीभाव,नीती आणि समाज उद्धाराचे बी पेरणारा हा संत.वैश्विक स्तरावर वंदनीय ठलतो.ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीने जसा विश्व साहित्यावर आपले नाव कोरले त्याप्रमाणेच तुकारामांच्या अभंगवाणीने विश्वातील मानवाच्या मनात आपले नाव कोरले.

संत तुकाराम हे समाजसुधारकाच्या भूमिकेतून समाज जागृती करीत असताना जीवनातील 'सत्' च्या पुरस्कारासोबत 'असत्' चा निषेध करताना दिसून येतात. 'आम्हा हे कौतुक जगा द्यावी नीत।करावे फजित चुकती जे।' अशा प्रकारे समाज मनाला नीतिमत्ता शिकवीत, चुकणाऱ्याला त्याच्या चुकीची जाणीव करून देत, तुकाराम लोकशिक्षकाच्या भूमिकेत दिसतात.संत ज्ञानेश्वर ते संत तुकाराम या दरम्यानच्या कालखंडात जेवढे संत होऊन गेले त्या सर्वांनी आपापल्या साहित्यातून वैश्विक मूल्यांची पेरणी केली. सामाजिक समता, बंधुता, न्याय या मूल्यांची रुजवणूक केली. त्यांनी वर्णभेद ,जातीभेद यांचा समूळ नायनाट व्हावा यासाठी प्रयत्न केले.जातिभेद वर्णभेदाचे चटके सहन केलेल्या संतांनी आपल्या आंतरिक व्यथा अनेक अभंगातून व्यक्त केल्या .त्यामुळेच त्यांना या विषमतावादी समाज व्यवस्थेचा मानवाला होत असलेला त्रास नष्ट करावयाचा होता. समता, बंधुता या दृष्टिकोनामुळे सामाजिक जीवनात एक प्रकारची शांती निर्माण होते. याचे चिंतन ते सातत्याने करताना दिसतात. महाराष्ट्रातील संत परंपरा पाहता यात वेगवेगळ्या सामाजिक स्तरातून, जातीतून आलेल्या संतांचा समावेश होता.वारकरी संप्रदायाने या सर्व संतांना आपलेसे केले होते. भक्तीच्या क्षेत्रात लोकशाही वाटावी अशी व्यवस्था दिसते पण त्यातही काही संतांना जातीभेद, वर्णभेदामुळे निर्माण झालेल्या विषमतेच्या छळाला सामोरे जावे लागले. या छळाला सामोरे जाताना त्यांना झालेल्या यातना, मनातील दुःख मांडताना त्यांच्या मनातील विश्वातील प्राणिमात्रांविषयीची करुणेची भावना यत्किंचितही कमी झाली नाही हे विशेषत्वाने सांगावेसे वाटते. सर्व भूतलावरील प्राणिमात्रांविषयीची त्यांची मैत्री भावना अधिक ठळकपणे त्यांनी मांडली. एकूणच काय तर महाराष्ट्रातील संत परंपरेने जी साहित्य निर्मिती केली त्यात आपला समाज, आपला देश ही संकुचित वृत्ती न ठेवता विश्वातील मानवासाठींचा उदात्त दृष्टीकोन मनाला भुरळ घालतो.त्यांची सर्वांविषयीची मंगल कामना संपूर्ण विश्वाला एका सुत्रात बांधून ठेवतेएवढे सामर्थ्य संत साहित्यात आहे.या लेखात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या साहित्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. या दोन्ही संतांच्या साहित्यातून जी वैश्विकता दिसून येते .ती संपूर्ण मानव जातीसाठी वंदनीय ठरते.

संदर्भ ग्रंथ -
१)डॉ. यु.म.पठाण-संतसाहित्य शोध आणि बोध
प्र.आ.१५ मार्च २०१४ प्रकाशन-दिलीपराज प्रकाशन, पुणे
२) माधव कानिटकर- दैनंदिन सकळ संतगाथा
प्र.आ.२००२ प्रकाशन-डायमंड पब्लिकेशन्स पुणे
३) वेद कुमार वेदालंकार- मराठी संत काव्य
प्र. आ.२०००, प्रकाशन -विकास प्रकाशन कानपूर
४) गजानन नारायण जोशी -भारतीय तत्त्वज्ञानाचा बृहद् इतिहास
सातवा खंड महाराष्ट्र संत
प्र.आ.१९९४ प्रकाशन -मराठी तत्त्वज्ञान - महाकोश मंडळ पुणे

**संत साहित्यातील विश्वात्मकता**

**डॉ.कविता चंद्रकांत लोहाळे**